

## डॉ. वंदना धाकतोडे

**अष्टपैलू व्यक्तिमत्त्व**

नेहमी जे हृदयात परोपकाराची भावना बाळगतात, त्यांना प्रत्येक पावलावर प्रगती, यश आणि समृद्धी मिळते,' या ओळी ज्यांना तंतोतंत लागू पडतात असं प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. वंदना धाकतोडे होय. डोंबिवली (पूर्व) येथील ओम हॉस्पिटल आणि डोंबिवली (पश्चिम) येथील साई श्रद्धा हॉस्पिटलच्या संचालिका म्हणून त्या सर्वपरिचित आहेत. त्यांनी त्यांच्या यशाच्या मार्गात एक तत्त्व स्वीकारलं आहे– ते म्हणजे जास्तीत जास्त महिला कर्मचारी नियुक्त करणे. वैद्यकीय आणि सामाजिक कार्य यांसाठी त्यांना सन २०२१ मध्ये 'विमिन हू लीड नॅशनल अवॉर्ड'मध्ये वुमन अचिव्हर (हेल्थकेअर) अशा विविध पुरस्कारांनी पुरस्कृत करण्यात आले आहे.

सध्याच्या काळात, भारतामध्ये महिला डॉक्टरांच्या, विशेषत: सर्जन्सच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे. तथापि, ९० च्या दशकाच्या सुरुवातीस गोष्टी सामान नव्हत्या. पितृसत्ताक व्यवस्थेत आपले करिअर घडविण्यासाठी बहुतांश महिलांना संघर्ष करावा लागला. ज्यांनी हे शक्य केले त्यांच्यापैकी डॉ. वंदना धाकतोडे या डोंबिवलीच्या पहिल्या महिला सर्जन म्हणून प्रसिद्ध आहेत. डॉ. वंदना धाकतोडे या १९९५ पासून मुंबई उपनगरात सेवा पुरवणाऱ्या उत्कृष्ट जनरल सर्जन आहेत. विशेष म्हणजे त्या आपल्या या यशाचे श्रेय पती डॉ. शरद धाकतोडे यांना देतात.

१२ जानेवारी १९६८ रोजी मुंबई येथे अग्रवाल कुटुंबात त्यांचा जन्म झाला. ती एकूण तीन भावंडे. मोठा भाऊ सीए होता, परंतु अल्पआयुतच काळाने त्याच्यावर झडप घातली. त्यांची लहान बहीणसुद्धा यशस्वी डॉक्टर आहे व सध्या युएसए येथे स्थाईक आहे. त्यांचे वडील एका कंपनीत सेल्स मॅनेजर म्हणून कार्यरत होते. ते मूळचे दिल्लीचे परंतु ते नोकरीनिमित्त मुंबईत आले व पुढे येथेच स्थाईक झाले.

वंदना यांचं संपूर्ण बालपण मुंबईतच गेलं. शाळेला सुट्ट्या लागल्या की सारं कुटुंब दिल्लीला जात. 'मुंबईवाले' आले अशा रुबाबात तेथे त्यांचं स्वागत केलं जाई. त्यांचं शालेय शिक्षण चेंबूर येथे, तर अकरावी-बारावीचं शिक्षण माटुंगा येथील रुईयामधून झालं. शालेय जीवनात त्या अत्यंत चाणाक्ष व हुशार विद्यार्थिनी होत्या. अभ्यासाव्यतिरिक्त शाळेत होणाऱ्या प्रत्येक स्पर्धेत त्या सहभागी असायच्या. त्यांची आई गृहिणी होती. त्यांची जडणघडण पारंपरिक कुटुंबात झाली होती. साहजिकच, आपल्या मुलीने आपल्या सांस्कृतिक बाबी शिकाव्यात, त्या जपाव्यात असं त्यांना वाटत असे. त्यांनी डॉ. वंदना यांना अगदी पाककलेपासून शिवणकाम, विणकाम, पेंटिंग, मेहंदी डिझाइन या सर्व गोष्टी शिकवल्या. त्यांचं मत होतं की मुलींना ह्या सर्व पारंपरिक सांस्कृतिक गोष्टी आल्याच पाहिजेत. या तुलनेत त्यांचे वडील तितकेच पुढारलेल्या विचारांचे होते. त्यांनी डॉ. वंदना यांना पावलोपावली सहकार्य केलं. बाहेर मुलांसोबत खेळणं, उशिरापर्यंत बाहेर फिरणं यागोष्टी त्यांना आवडत नसत; परंतु आपल्या मुलीच्या सर्जन होण्याच्या इच्छेला पूर्णत्वास नेण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. त्या ज्या सोसायटी मध्ये राहायच्या तेथे सर्वच जाती-धर्मांचे लोक एकत्र राहत असत. त्यांचे एका ख्रिश्चन कुटुंबाशी सलोख्याचे संबंध होते. त्यामुळे ख्रिसमस आणि दिवाळी हे दोन्ही सण ते एकत्र साजरे करत. गणपती उत्सव, शिवजयंती, सार्वजनिक उपक्रम इतर इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रम सार्वजनिक स्वरूपात



साजरे केले जात. यातूनच सार्वजनिक कार्याची आवड त्यांच्यात लहानपणापासूनच जोपासली गेली असं म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

तिन्ही भावंड एकत्र शाळेत होती. शाळेच्या वेळेच्याव्यतिरिक्त शाळेत काही कार्यक्रम असल्यास त्यासाठी थांबण्याची घरातून परवानगी नव्हती. त्यावेळी ती बंधनं वाटत असली तरी आज त्या काळाच्या दृष्टिकोनातून ते योग्यच होते याची प्रचीती येते. किंबहुना, आज आपण आपल्या मुलांशी जे काही वागतो ते त्यांनादेखील बंधन वाटत असणार.

जेव्हा वंदनाताई सर्जरीच्या शिक्षणासाठी गेल्या तेव्हा ७ दिवस त्या युनिटच्या बाहेर पडल्याच नव्हत्या. मुलीच्या काळजीने वडिलांचं हृदय कासावीस झालं, कारण त्यावेळी

**डॉ. वंदना यांना एका ज्योतिषांनी सांगितलं होतं, की तू डॉक्टर होणार. त्यांना स्वतःलासुद्धा डॉक्टरांप्रती आदर होता. डॉक्टर होण्याचा हा प्रवास त्यांच्यासाठी सोपा नव्हता. कारण त्याकाळात एका महिलेने सर्जन होणं हे एक दिव्यच होतं. यासाठी त्यांच्या कुटुंबातून सर्वांचा विरोध होता. परंतु सर्वांचा विरोध स्वीकारून त्यांचे वडील ठामपणे त्यांच्या पाठीशी उभे राहिले व अशारीतीने त्या महिला सर्जन बनल्या. या क्षेत्रात यशस्वीही ठरल्या. दोन दशकांहून अधिक काळातील यशस्वी कारकिर्दीत डॉ. वंदना यांनी पाइल्स/ फिशर, फिस्टुला, स्तन, हर्निया आणि गॅस्ट्रोइंटेस्टाइनल रोगांशी संबंधित केसेस हाताळल्या आणि रुग्णांना यशस्वीपणे आजारमुक्त केले.**



फोन नव्हते, संपर्काचा कोणताही मार्ग नव्हता. म्हणून वडील स्वतः त्यांना शोधत आले. इतक्या दिवसांनी मुलीला भेटल्यावर व ती सुखरूप आहे हे पाहिल्यावर त्यानी निःश्वास सोडला. डॉक्टर ए.एन. सुपे हे त्यांचे युनिट-हेड होते. या दरम्यानचा अनुभव सांगताना डॉ. वंदना म्हणतात की, ''या सात दिवसांमध्ये शनिवार-रविवार इमर्जन्सी पिरीएड असायचा. या दोन दिवसांच्या इमर्जन्सीमध्ये १० रुग्ण दगावले होते. हा अनुभव वंदनाताईंसाठी पहिलाच होता. मृत व्यक्तींच्या नातेवाइकांना त्यांचा पेशंट दगावला आहे हे कसं आणि कोणत्या शब्दात सांगायचं या मन:स्थितीमुळे त्या स्वतः भांबावून गेल्या होत्या. परंतु डॉ. ए. एन. सुपेंनी त्यांना अशी परिस्थिती कशी हाताळायची हे शिकवलं. त्यांच्या युनिटमध्ये त्या एकमात्र महिला डॉक्टर होत्या. महिला डॉक्टर असल्यामुळे त्यांना कामाचा जास्त व्याप सांभाळता येणार नाही म्हणून त्यांना मुद्दामच फिमेल वॉर्डमध्ये सुरुवातीला काम देण्यात आलं. परंतु एक आठवड्याच्या आतच त्यांची कामातील गती आणि हुशारी बघून कॉमन वॉर्डमध्ये त्यांना काम दिलं गेलं. त्यांनी पावलोपावली स्वतःला सिद्ध करत आपल्या क्षेत्रात यश संपादन केलं व त्या एक यशस्वी जनरल सर्जन बनल्या.

डॉ. शरद धाकतोडे हे त्यांचे सीनिअर होते. त्यांनी आपल्या सांस्कृतिक चौकटीबाहेर जाऊन, घरच्यांचा विरोध पत्करून डॉ. शरद धाकतोडे यांच्याशी आंतरजातीय विवाह केला. सासरी गेल्यावर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पेलली. हळूहळू काळ पुढे सरकत गेला. म्हणतात ना, काळ हेच प्रत्येक जखमेवरील औषध आहे. कालांतराने त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्या या विवाहास स्वीकृती दिली. डॉ. वंदना यांचे आई-वडील गेल्या १०-१२ वर्षांपासून त्यांच्यासोबतच राहत आहेत.




त्यांच्या संसारात एक मुलगा आणि एक मुलगी यांनी आनंदाची चौकट निर्माण केली. आता त्या पूर्णपणे मुलांना वाढवणे व हॉस्पिटल यातच व्यस्त झाल्या. त्यांची मुलगी शीतल धाकतोडे हिने फार्मसी मधून शिक्षण पूर्ण केलं आहे. पुण्यातील इंद्रजित बुकटे यांच्याशी तिचा विवाह झालेला असून ती लग्नाआधी डॉ. वदंनाताईंच्या हॉस्पिटलचा फार्मसी विभाग सांभाळत असे. मुलगा चिराग धाकतोडे याने एमबीबीएस केलं असून तो डॉक्टर दाम्पत्याच्या पावलांवर पाऊल ठेवत वैद्यकीय क्षेत्रात पदार्पण करण्याच्या मार्गावर आहे.

वंदनाताईंनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात केडीएमसी, शास्त्रीनगर, डोंबिवलीत मेडिकल ऑफिसर, तेरना आणि एमजीएम मेडिकल कॉलेजमध्ये व्याख्याता आणि सल्लागार सर्जन म्हणून केली. आजमितीस एक यशस्वी उद्योजिका, सामाजिक कार्यकर्ता आणि एक उत्तम सर्जन अशी आगळीवेगळी ओळख त्यांनी निर्माण केली आहे. केएफएम हॉस्पिटल मुंबईतून शस्त्रक्रियेतील मास्टरी (एमएस) पूर्ण केल्यानंतर, लेडी सर्जन डॉ. वंदना डोंबिवलीतील  शासकीय रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून प्रॅक्टिस करू लागल्या. गरीब रुग्णांची दुर्दशा आणि रुग्णालयांमध्ये योग्य पायाभूत सुविधांचा अभाव या गोष्टी लक्षात घेऊन वैद्यकीय क्षेत्रामध्ये सर्वांना परवडणारी सुलभ आरोग्य सेवा प्रदान करण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी आपले कार्य सुरू केले व ते अविरत सुरू आहे.

त्यांनी २००० मध्ये सर्जन पती डॉ. शरद धाकतोडे यांच्यासमवेत 'ओम हॉस्पिटल'ची पायाभरणी केली. या डॉक्टर दाम्पत्याने अथक परिश्रम करून सिंगल स्पेशालिटी क्लिनिकला मल्टीसुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये विकसित केले. थेंब




कितीही लहान असला तरी त्याच्यात अथांग सागरात तरंग निर्माण करण्याची क्षमता असते, ते तरंग म्हणजे आज संस्थेचे रूपांतर रुग्णालयांच्या समूहात झाले आहे. ज्यात ISO आणि NABH मान्यताप्राप्त ओम रुग्णालय, साईश्रद्धा रुग्णालय, ओम पॉलीक्लिनिक्स आणि OASIS (ओम प्रगत सर्जिकल आणि गहन सेवा) रुग्णालय यांचा समावेश आहे. डोंबिवलीतील या रुग्णालयांना सर्वोच्च आरोग्य सुविधांबाबतीत उच्च दर्जा

**हेल्थ ॲक्सेस ब्रँड श्रेणीतील उत्कृष्ट कामगिरीसाठी इंटिग्रेटेड हेल्थ ॲंड वेलनेस काउन्सिलद्वारे इंडिया हेल्थ ॲंड वेलनेस अवॉर्ड्स २०२० च्या सहाव्या आवृत्तीदरम्यान पुरस्काराने सन्मानित होणारे ओएम हॉस्पिटल हे पहिले हॉस्पिटल आहे. डॉ. धाकतोडे यांच्या ओम रुग्णालयात, सर्वसमावेशक वैद्यकीय सेवा प्रदान करण्यासाठी आणि कार्यसिद्धीच्या प्रत्येक क्षेत्रात गुणवत्ता राखून रुग्णांना गुणवत्तापूर्ण उपचार देण्यासाठी वचनबद्ध आहे. २४ खाटांच्या सुसज्ज हॉस्पिटलमध्ये २ डी इको, E.C.G, ICU, क्ष-किरण अशा सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत. अल्ट्रा सोनोग्राफी, पॅथॉलॉजी, मेडिकल शॉप आणि रुग्णवाहिका या आवश्यक साधनांमध्ये सतत सुधारणा करून रुग्णांना वेळेत उपचार उपलब्ध व्हावेत यादृष्टीने अल्पावधीत निदान आणि उपचारात्मक उपकरणांचे शून्य टक्के ब्रेकडाउन केले आहे.**




देण्यात आला आहे, ते आसपासच्या परिसरात आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र प्राप्त करणारे ते पहिले रुग्णालय आहे.

नेतृत्व आणि कर्तृत्व कुणाकडूनच उसने मिळत नाही, ते स्वतःलाच निर्माण करावे लागते याची प्रचिती म्हणजे कोरोना महामारीच्या काळात सर्व प्रोटोकॉलचे पालन करत हॉस्पिटलने उत्कृष्ट सेवा बजावली. डॉ. धाकतोडे आणि त्यांच्या टीमने तापासाठी ओपीडी (बाह्य रुग्ण  विभाग) निर्माण केला. औषधांची व्यवस्था केली, ऑनलाइन होम आयसोलेशन उपचार केले, दुसऱ्या लाटेत कोविड वॉर्ड तयार केला आणि आता लसीकरण करत आहेत. 'मेहनत करने का कोई मौसम नहीं होता, जब करना शुरू करो; वही मौसम हसीं बन जाता है-' हे त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वातून सिद्ध केलं आहे. इतकंच नव्हे, तर रुग्णांवरचा आर्थिक भार कमी करण्यासाठी हॉस्पिटल कॅशलेस मेडिक्लेम सुविधादेखील देते.

आज भारतातील प्रेरणादायी महिला डॉक्टर महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत आणि समाजाच्या कल्याणासाठी योगदान देत आहेत. त्यांचा वारसा जपत डॉ. वंदना धाकतोडे या एक समर्पित जनरल सर्जन म्हणून निष्ठेने कार्यरत आहेत. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य महिलांच्या सेवेसाठी, विशेषतः त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी समर्पित केलं  आहे. या त्यांच्या  समर्पणाने त्यांना  सर्व वयोगटांतील महिलांसाठी आरोग्य आणि निरोगीपणा कार्यक्रम सुरू करण्यास प्रवृत्त केले, उदा. कर्करोगाचा प्रतिबंध आणि शोध, उपचार, प्रसूतिपूर्व आणि प्रसवोत्तर काळजी, आहार आणि व्यायामासह (फिटनेस) आणि महिलांचे मानसिक आरोग्य यांवर विशेष भर दिला. शिवाय, त्यांच्या रुग्णालयांमध्ये

महिलांना नोकरीत प्राधान्य देणे हे महिला सबलीकरणाचा पाया उंचावण्यासाठी त्यांच्या दृष्टिकोनातून बरेच काही सांगते.

हृदयात नेहमीच जे परोपकाराची भावना बाळगतात, त्यांना प्रत्येक पावलावर प्रगती, यश आणि समृद्धी मिळते. डॉ. वंदना अनेक सेवाभावी संस्थांसोबत सक्रियपणे कार्यरत आहेत. डॉ. वंदना यांना त्यांच्या यशस्वी प्रवासात अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. कोविड १९ मधील त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना अनेक कौतुक-पुरस्कार मिळाले होते. डॉ. विजय सूर्यवंशी, माननीय आयुक्त, केडीएमसी यांनी पुरस्कार आणि नंतर आमदार श्री. रवींद्र चव्हाणजी यांच्या हस्ते आणखी एक पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. वंदना यांचा विविध जिल्हा क्लबकडून सत्कार करण्यात आला. कोरोना महामारीच्या काळात अथक वैद्यकीय मदतीसाठी रोटरीचे वैद्यकीय आणि सामाजिक कार्य यांसाठी त्यांना सन २०२१ मध्ये विमिन हू लीड नॅशनल अवॉर्ड, वुमन अचिव्हर (हेल्थकेअर), वूमन आंत्रप्रेन्युअर अवॉर्ड अशा विविध पुरस्कारांनी पुरस्कृत करण्यात आले आहे.

ना कुणाशी स्पर्धा असावी, ना कुणाच्या पुढे जाण्याची आकांक्षा असावी; फक्त स्वतःला सिद्ध करण्याची जिद्द असावी, हे तत्त्व डॉ. वंदना धाकतोडे यांनी आपल्या कार्यकर्तृत्वातून सिद्ध करून दाखवलं. डॉ. वंदना धाकतोडे यांचा हा यशस्वी प्रवास असाच उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जाओ अशी ईश्वरचरणी प्रार्थना. एक मुलगी, बहीण, पत्नी, आई, यशस्वी डॉक्टर; किंबहुना, याहूनही अधिक एक सेवाभावी डॉक्टर अशा विविध भूमिका त्यांनी अगदी चोखपणे बजावल्या आहेत. त्यांच्या या यशस्वी कारकिर्दीत त्यांना पती डॉ. शरद धाकतोडे यांचे सहकार्य लाभले. त्यांची साथ अशीच सदैव लाभू दे हीच सदिच्छा.'